प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑक्टोबर 19, 2016

**दि तुमकुर वीरशैव सहकारी बँक लि., तुमकुर, कर्नाटक**
**हयांचेवर आरबीआयद्वारा दंड लागु.**

तुमकुर वीरशैव सहकारी बँक लि., तुमकुर, कर्नाटक हयांचेवर आरबीआयने बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित, कलम 47अ (1)(ब) च्या तरतुदींनी तिला दिलेल्या अधिकाराचा वापर करुन, रु. 10.00 लाख (रुपये दहा लाख) दंड लागु केला असून, हा दंड, एप्रिल 11, 2005 च्या परिपत्रकातील रिझर्व बँकेने दिलेल्या सूचनांचे/मार्गदर्शक तत्वांचे (मागील वर्षामधील नफ्याच्या 1% पेक्षा अधिक देणगी देण्यास मनाई) आणि जुलै 1, 2015 च्या केवायसी/एएमएल वरील महापरिपत्रकाच्या उपखंड (4) (ड) 3.2.2-1 (ब) चे (व्यक्ती सोडून अन्य खाती उघडतांना ग्राहकांबाबत योग्य परिश्रम घेणे वरील) उल्लंघन केल्याबद्दल लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने लेखी उत्तर सादर केले होते. हया प्रकरणातील सत्य व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की, उल्लंघने झाली असून दंड करणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/971**